हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

दि. 12/01/2020

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :–**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि 11/01/2020 रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या (09) वाहन चालकाविरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचेकडुन 1800/– रूपये दंड वसुल करण्यात आला आहेत.

**दुखापत :–**

दिनांक 11/01/2020 रोजी फिर्यादी गयाबाई भ्र शंकर राठोड व्य शेती रा लिंगदरी ता सेनगाव यांच्या फिर्यादीवरून पोस्टे सेनगाव येथे कलम 324,323,504,506,34 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन दिनांक 10.01.2020 चे दुपारी बारा वा चे सु मौजे लिंगदरी षिवारातील शेत गट क्र 36 मध्ये यातील आरोपीतांनी संगणमत करून वाद असलेले शेतातील तुर कपणी करण्याचे कारणावरून फिर्यादी यांचे पती यास लोखंडी गजाने कपाळावर मारहाण केली तसेच फिर्यादीस थापडबुक्यांनी मारहाण केली व शिवीगाळ करून जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या या संदर्भात सेनगाव पोलीस तपास करीत आहेत.

दिनांक 11/01/2020 रोजी फिर्यादी साहेबराव मदन साळवे व्य शेती रा चोंढी खु ता सेनगाव यांच्या फिर्यादीवरून पोस्टे गोरेगाव येथे कलम 324,323,504,506,34 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन दिनांक 10.01.2020 चे 15.00 वा सु दत्तराव साळवे यांचे घरासमोर रोडवर मौजे चोंढी खु येथे यातील आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस आरोपीने तु माझ्या बायकोला पैसे का मागीले या कारणावरून फिर्यादीस दत्तराव साळवे यांचे घरासमोर रोडवर नेवुन प्रकाष दत्तराव साळवे यांने त्याचे हातातील काठीने फिर्यादीस दंडावर छातीवर मारले व सर्वानीच फिर्यादीस शिवीगाळ करून तु जर परत पैसे मागीतले तर तुला जिवे मारतो अषी धमकी दिली या संदर्भात गोरेगाव पोलीस तपास करीत आहेत.

दिनांक 11/01/2020 रोजी फिर्यादी गजानन रामराव गाडे व्य शेती रा रिधोरा ता सेनगाव यांच्या फिर्यादीवरून पोस्टे नर्सी ना. येथे कलम 324,504,506 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन दिनांक 11.01.2020 चे दुपारी 13.00 वा सु फिर्यादीचे शेतात सामाईक धु–यावर रिधोरा येथे यातील आरोपीने फिर्यादीस शेतातील भिजवनिचे पाणी का जाउ दिले या कारणांवरून हातातील काठीने पाठीवर पायावर व हातावर मारून दुखापत केली व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली या संदर्भात नर्सी ना. पोलीस तपास करीत आहेत.

**चोरी :–**

दिनांक 11/01/2020 रोजी फिर्यादी सलीम खॉ साहेब खॉ पठाण व्य चालक रा मातंगवाडा कळमनुरी ता कळमुनरी यांच्या फिर्यादीवरून पोस्टे कळमनुरी येथे कलम 379 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन दिनांक 10.01.2020 रोजी रात्री 11.00 वा ते दि. 11.01.2020 रोजी सकाळी 08.00 वा च्या दरम्याण जुने बसस्थानक कळमनुरी नगर परिषद कॉम्पेलेक्स शटर समोर मोकळया जागेत कोण्यातरी अज्ञात चोरटयाने एकुण 07 वाहनाचे डिझेल टाकीचे पाईप कापुन अंदाजे 106 लिटर डिझेल ज्यांची अंदाजे कि 7640 रू दि.10.01.2020 रोजी रात्री 11.00 वा ते दि 11.01.2020 रोजी सकाळी 08.00 वा दरम्याण सदरील 7 वाहनाचे डिझेल अज्ञात चोराने चोरून नेले आहे या संदर्भात कळमनुरी पोलीस तपास करीत आहेत.

**मरणास कारनिभुत ठरणाऱ्या आरोपी विरूध्द अपराध दाखलः–**

दिनांक 11/01/2020 रोजी फिर्यादी सुरज पिता पंडीतराव दळवी व्य षिक्षण रा जिजामातानगर हिंगोली यांच्या फिर्यादीवरून पोस्टे कळमनुरी येथे कलम 279,304अ,337,338 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन दिनांक 08.01.2020 रोजी चे सायंकाळी 6.30 वा चे सु मौजे वारंगा मसाई येथील पुलाजवळ यातील मोसा क्र एमएच 38 आर 3584 च्या चालकाने त्यांच्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन यातील मयत ऋतीक वाघमारे रा नांदापुर ता कळमनुरी जि हिंगोली चालवीत असलेल्या मोटार सायकल क्र एमएच 26 ई 9992 ला पाठीमागुन धडक देवुन डोक्यास मार लागुन त्यास गंभीर जख्मी केले व त्याचे मरणास कारणीभुत झाला व साक्षीदार फिर्यादी या दोघांना धडक देवुन त्यांना जख्मी केले या संदर्भात कळमनुरी पोलीस तपास करीत आहेत.

**फसवनुकः–**

दिनांक 11/01/2020 रोजी फिर्यादी हुकुमचंद देविदास वाळले व्य सेवा निवृत कर्मचारी रा जिजामाता नगर हिंगोली यांच्या फिर्यादीवरून पोस्टे हिंगोली शहर येथे कलम 406,420 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन दिनांक 10.01.2020 रोजी 11.30 वा पीपल्स बॅक समोरील एस बी आय एटीम हिंगोली येथे यातील अनोळखी आरोपीने फिर्यादी यांचे एस बी आय बॅकेचे ए टी एम कार्डचा वापर करून फिर्यादी यांचा विष्वासाने फसवणुक करून बॅक खात्यातुन पैसे ट्रॉन्सफर केले व काढुन घेतले या संदर्भात हिंगोली शहर पोलीस तपास करीत आहेत.

पोलीस अधीक्षक हिंगोली
करीता